**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०३ मे २०२५**

**ठळक बातम्या**

1. पाकिस्तानकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या आयातवर बंदी.
2. वेव्हज २०२५ परिषदेत ७ आंतरराष्ट्रीय कंपन्यांबरोबर आयआयसीटीचे सामंजस्य करार, महाराष्ट्रातल्या येरला वाणी कम्युनिटी रेडियो केंद्राला वेव्हज् २०२५ मधे राष्ट्रीय पुरस्कार.
3. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 100 दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमात नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयाचा संपूर्ण राज्यातून द्वितीय क्रमांक.
4. नागपूरच्या काही भागात वादळी वाऱ्यासह पावसाची हजेरी, विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात येलो अलर्ट.

---------------------------------------

**आयात बंद**

पहलगाम हल्ल्या नंतरच्या धोरणाचा भाग म्हणून, भारतानं पाकिस्तानकडून आयात बंद केली आहे. पाकिस्तानातून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या निर्यात झालेल्या किंवा वाटेत असलेल्या सर्व प्रकारच्या वस्तूंवर तत्काळ बंदी घातल्याची अधिसूचना परदेश व्यापार महासंचालनालयानं जारी केली आहे. यातून सूट मिळवायची असल्यास सरकारची वेगळी परवानगी घ्यावी लागेल असं अधिसूचनेत म्हटलं आहे.

---------------------------------------

**राष्ट्रीय बाल पुरस्कार**

५ ते १८ वर्षे वयोगटातल्या मुलांसाठी पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्कार-२०२५ साठी, या वर्षीच्या ३१ जुलैपर्यंत, इच्छूक आपले अर्ज दाखल करू शकतात. शौर्य, समाजसेवा, पर्यावरण, क्रीडा, कला आणि संस्कृती, विज्ञान आणि तंत्रज्ञान यासारख्या श्रेणींमध्ये, उत्कृष्टता दाखविणाऱ्या मुलांना हा पुरस्कार दिला जातो. सर्व अर्ज awards.gov.in या अधिकृत राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलद्वारे ऑनलाइन सादर करावीत. पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्कार हा, देशभरातल्या मुलांच्या

अपवादात्मक कामगिरीची दखल घेण्यासाठी, दरवर्षी राष्ट्रपतींकडून दिला जाणारा एक प्रतिष्ठित राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार आहे.

---------------------------------------

*अश्विनी वैष्णव*

प्रसार माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात, भारत जगाचं नेतृत्व करु शकतो असं प्रतिपादन, माहिती आणि प्रसारण मंत्री, अश्विनी वैष्णव यांनी केलं आहे. ते आज मुंबईत, पत्रकार परिषदेत बोलत होते.....

*(होल्ड बाईट - अश्विनी वैष्णव)*

*IICT will be such a major institution in the coming days that this will set a safe template that we created for a IIT system and the IIM system. I look forward to more and more inputs from the industry participants. We are very open minded government our Prime Minister always encourages us to listen and make the changes which are required for helping our youngsters.*

गुगल, मेटा आणि मायक्रोसॉफ्टसह, सात आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी आज वेव्हज-२०२५ परिषदेत, Indian Institute of Creative Technology बरोबर सामंजस्य करार केल्याची माहिती त्यांनी दिली.

---------------------------------------

डॉ.एल.मुरुगन

कम्युनिटी रेडिओच्या, देशभरात सुरु असलेल्या कार्याची, माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल.मुरुगन यांनी प्रशंसा केली आहे. ते आज वेव्हज् परिषदेत कम्युनिटी रेडिओच्या उदघाटन सत्राला संबोधित करताना बोलत होते. सर्व कम्युनिटी रेडिओ काही उद्दिष्टांनी चालवली जात असून त्यामुळे आपल्या परंपरांना प्रोत्साहन मिळत आहे असं ते म्हणाले. दहाव्या राष्ट्रीय कम्युनिटी रेडिओ पुरस्कारांचं वितरण, मंत्री मुरुगन यांच्या हस्ते झालं. नवोन्मेष श्रेणीत राज्यातल्या, येरला वाणी या कम्युनिटी रेडिओला राष्ट्रीय पातळीवर पहिला पुरस्कार प्रदान करण्यात आला. कम्युनिटी रेडिओच्या काम काजातून, समर्पण आणि वचनबद्धता प्रतीत होत असल्याचं, माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यावेळी म्हणाले.

---------------------------------------

परकीय चलन

देशाच्या परकीय चलन साठ्यात, २५ एप्रिल रोजी संपलेल्या आठवड्यात, अंदाजे दोन अब्ज डॉलर्सची वाढ झाली असून, तो सुमारे ६८८ अब्ज डॉलर्सवर पोहोचला आहे. रिझर्व्ह बँकेनं प्रकाशित केलेल्या, साप्ताहिक आकडेवारीत म्हटलंय की, गेल्या आठवड्यात, परकीय चलन मालमत्ता, दोन अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक वाढून, सुमारे ५८० अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. दरम्यान, विशेष कर्जपात्रता हक्क, दोन कोटी १० लाख डॉलर्सनं वाढून, १८ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक झालं आहे. आंतरराष्ट्रीय नाणे निधीमध्ये मध्यवर्ती बँकेची पतही, वीस लाख डॉलर्सनं वाढून, साडेचार अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे. तथापि, सोन्याचा साठा, २०७ दशलक्ष डॉलर्सनं कमी होऊन, ८४ पूर्णांक ३७ शतांश अब्ज डॉलर्सवर आला आहे.

---------------------------------------

नागपूर ग्रामीण पोलीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून, प्रशासनाला गतिमानता येण्यासाठी, क्षेत्रीय कार्यालयासाठी, १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रम सुरू करण्यात आला होता. पोलीस विभागा अंतर्गत, संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून सर्वोत्तम पाच पोलीस अधीक्षक कार्यालयांची निवड करण्यात आली. ज्यात पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर ग्रामीण यांचा, संपूर्ण राज्यातून, १०० पैकी ८० गुण मिळवून, द्वितीय क्रमांक आला असल्याची माहिती, विशेष पोलीस महानिरीक्षक नागपूर परिक्षेत्र, दिलीप पाटील-भुजबळ यांनी, पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर ग्रामीण इथं घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. ए.आय.चा वापर नागपूर ग्रामीण पोलीस करत असल्याचं ते म्हणाले

*(होल्ड बाईट - दिलीप पाटील-भुजबळ १५ सेकंद)*

*या मूल्यमापनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून आपली जी ट्रॅडिशनल किंवा जी पोलीस ट्रेड क्राफ्ट मधली जी प्रोफेशनल पोलिसिंग आहे. तो वापर काय काय केलेला आहे याचा सुद्धा असेसमेंटमध्ये मूल्यमापनामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.*

या विशेष मोहिमे अंतर्गत, संकेत स्थळ, केंद्र शासनाशी सुसंवाद, स्वच्छता, तक्रार निवारण, कार्यालयीन सोयी सुविधा, कामकाजातील सुधारणा, अधिकारी कर्मचारी यांचं प्रशिक्षण सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर, आर्थिक आणि औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन, नाविन्यपूर्ण उपक्रम

सुकर जीवनमान, कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा या मुद्द्यावर प्रभावी कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते.

---------------------------------------

आयपीएल क्रिकेट

आय.पी.एल.क्रिकेट स्पर्धेत आज बंगळुरु इथं, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि चेन्नई सुपर किंग यांच्यात सामना होणार असून, काल अहमदाबाद इथं झालेल्या या सामन्यात गुजरात टायटन्सनं, सनरायजर्स हैदराबादचा ३८ धावांनी पराभव केला.

---------------------------------------

हवामान

नागपूर शहरातील काही भागात आज, वादळी वाऱ्यासह, पर्जन्य वृष्टीची नोंद झाली. शांतीनगर भागात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला तर, पारडी, कळमना, परिसरात गारा देखील पडल्यात. शहराच्या इतर भागात ढगाळ वातावरणासह हलक्या पावसाची नोंद झाली. दरम्यान, आगामी काही तासात, भंडारा इथं मेघगर्जनेसह गारपीटीची शक्यता असून, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यात देखील तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह, गारपीट होण्याची शक्यता आहे. अमरावती, यवतमाळ, वाशिम, गडचिरोली जिल्ह्यात देखील वादळी पर्जन्यमान राहणार असल्याचा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं दिला असून, अकोला, बुलढाणा, वाशिम वगळता आज सर्वत्र येलो अलर्ट जारी करण्यात आला. उद्या देखील असंच पर्जन्यमान राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, आताच हाती आलेल्या बातमीनुसार गोंदिया जिल्ह्यात दुपारी वादळी वाऱ्यांमुळे काही घरांवरची छपरं उडाली. गडचिरोली मध्ये वादळ आणि विजांच्या कडकडाटाला सुरुवात झाली आहे.

---------------------------------------

राष्ट्रीय लोक अदालत

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशांप्रमाणे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नागपूरच्या वतीनं, येत्या १० मे रोजी, प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश तथा, अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, डी.पी.सुराणा यांच्या मार्गदर्शनाखाली, राष्ट्रीय लोक अदालतीचं आयोजन करण्यात आलं आहे. त्यात नागपूर जिल्ह्यातील हजारो न्यायालयीन प्रलंबित आणि दाखलपूर्व प्रकरणे, तडजोडीसाठी ठेवण्यात आली

आहेत. तरी सर्व संबंधीत पक्षकारांनी, लोक अदालतीमध्ये मोठ्या संख्येनं सहभाग नोंदवून लाभ घ्यावा असं आवाहन न्यायाधीश, सचिन पाटील, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नागपूर यांनी केले आहे. १० मे २०२५ रोजी, संपूर्ण महाराष्ट्रात उच्च न्यायालय आणि त्यांची सर्व खंडपीठ, जिल्हा न्यायालय, सर्व न्यायाधीकरण आणि तालुका न्यायालयांच्या ठिकाणी, एकाच वेळी राष्ट्रीय लोक अदालत होणार आहे.

---------------------------------------

आंबा मिलेट

उत्पादक ते थेट ग्राहक विक्री संकल्पनेतून, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, विभागीय कार्यालय नागपूर तर्फे, स्थानिक, कुसुमताई वानखेडे भवन, उत्तर अंबाझरी मार्ग इथं, आंबा आणि मिलेट धान्य महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. पाच मे पर्यंत हा महोत्सव सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत सुरू राहणार असून, या महोत्सवामध्ये कोकणातील हापूस, पायरी, दशहरी आणि राज्यातील विविध भागातील, केसर आंबा, विदर्भातील गडचिरोली सारख्या दुर्गम भागातील गोला आंबा, कलेक्टर आंबा यासारख्या तसंच इतर स्थानिक आंबा उत्पादकांच्या समावेश आहे. महाराष्ट्रातल्या काना कोपऱ्यातून, मिलेट धान्य उत्पादक सदर महोत्सवात आपल्या शेतमालासह, मध्यस्थी विना थेट ग्राहकांना विक्री करण्यासाठी सहभागी झाले आहेत.

---------------------------------------

चेंगराचेंगरी

गोव्यात शिरगाव इथल्या, लईराई देवीच्या जत्रेत, आज पहाटे झालेल्या चेंगराचेंगरीत, सहा जणांचा मृत्यू झाला असून, ८० जण जखमी झाले आहेत. देवळाच्या आवारात, निखाऱ्यांवरून अनवाणी चालण्याच्या पारंपरिक कार्यक्रमासाठी, आज पहाटे प्रचंड गर्दी झाली होती. यावेळी भाविकांमध्ये अचानक गोंधळ माजून ढकलाढकली झाली आणि अनेक जण, एकमेकांच्या अंगावर पडून जखमी झाले. या घटनेची माहिती कळताच, स्थानिक पोलीस आणि आपत्ती निवारण दल यांनी घटनास्थळी पोचून मदतकार्य सुरु केलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, या दुर्घटनेत झालेल्या जीवित हानीबद्दल दुःख व्यक्त केलं असून, जखमींना लवकर बरं वाटावं अशी कामना व्यक्त केली आहे. या कठीण प्रसंगात केंद्र सरकारचा गोवा सरकारला पूर्ण पाठिंबा असून,

**आवश्यक ती सर्व मदत करण्यासाठी स्थानिक प्रशासन तत्पर असल्याची ग्वाही, पंतप्रधानांनी दिली आहे.**

**-----------------------------------------**